# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.10.2024** **वारःशनिवार**

---

1. कर्मयोगी सप्ताहाचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज उद्घाटन
2. राष्ट्रीय स्तरावरील रबी कृषी संमेलनाचं आयोजन
3. राष्ट्रपतींचा तीन अफ्रिकी देशांच्या दौऱ्याचा आज अखेरचा टप्पा
4. झारखंड विधानसभेसाठी राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं जागावाटप जाहीर
5. न्यूझीलंडविरुद्धच्या कसोटी क्रिकेटमध्ये भारताच्या दुसऱ्या डावात 3 बाद 231 धावा

**<u>पंतप्रधान</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज राष्ट्रीय शिक्षण कर्मयोगी सप्ताहाचं नवी दिल्ली इथं उद्घाटन करतील. राष्ट्रीय शिक्षण सप्ताहात प्रत्येक कर्मयोगी किमान चार तास आपल्या क्षमतेशी निगडित काही नवीन शिक्षण्याचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी कटिबद्ध असेल. राष्ट्रीय शिक्षण सप्ताहात वैयक्तिक नागरिक, विविध मंत्रालयातील विभागातील कर्मचारी आणि इतर संघटनांमध्ये काम करणारे कर्मचारी सहभागी होतील. डिजिटल परिसंस्थेच्या मदतीनं नागरिकांच्या हितासाठी प्रशासकीय यंत्रणा तयार व्हावी आणि कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन मिळावं या उद्देशानं सप्टेंबर 2020 मध्ये कर्मयोगी अभियान सुरू करण्यात आलं. नागरी सेवा देणाऱ्यांसाठी क्षमता निर्मिती आणि मानव संसाधन व्यवस्थापनासाठी विकास साधण्याचा हा कार्यक्रम आहे.

**<u>कृषी संमेलन</u>**

राष्ट्रीय स्तरावरील रबी कृषी संमेलनाचं उद्घाटन केंद्रिय कृषी मंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या हस्ते आज नवी दिल्ली इथं होणार आहे. केंद्रिय कृषीराज्यमंत्री रामनाथ ठाकूर हे ही यावेळी उपस्थित राहतील. कृषी उत्पादन वाढवण्यासाठी नवीन तंत्रज्ञान आधारित पद्धतींमध्ये सहकार्य आणि नाविन्याला चालना देणं हा या परिषदेचा उद्देश आहे. तसंच आगामी रब्बी हंगामासाठी कोणते उपक्रम राबवले जाऊ शकतात आणि त्यासाठीच्या धोरणांवर चर्चा करण्यासाठी विविध मंत्रालयं, राज्यं, केंद्रशासित प्रदेश आणि संघटनांचं प्रतिनिधी एकत्र येतील

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आफ्रिकन राष्ट्रातील आपल्या तीन दिवसांच्या दौऱ्याच्या अखेरच्या दिवशी आज मलावीतील सांस्कृतिक स्थळांना भेट देणार आहेत. काल राष्ट्रपतींनी त्यांचे समपदस्थ लाजरस चकवेरा यांच्याशी द्विपक्षीय मुद्यांवर चर्चा केली. भारत आणि मलावीदरम्यान क्रीडा, युवा, औषधनिर्माण, कला आणि संस्कृती क्षेत्रात सहकार्यासाठी चार सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. भारतानं मलावीला एक हजार मेट्रिक टन तांदूळ आणि कर्करोगावरील उपचार सामग्री तसंच अवयव प्रत्यारोपण केंद्र उभारणीसह इतर वैद्यकीय मदत देण्यास मान्यता दिली. भारताच्या राष्ट्रपतींनी अलगेरिया, मोरिटानिया आणि मालावी या आफ्रिकन देशांना दिलेली ही पहिलीच भेट आहे. अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयांनं दिली.

**<u>NDA-झारखंड</u>**

राष्ट्रीय लोकशाही आघाडी अर्थात NDAनं झारखंड विधानसभा निवडणूकीसाठी युतीतील पक्षातील जागावाटप जाहीर केलं. झारखंड निवडणूकीसाठीचे सह-प्रभारी हेमंत बिस्वा शर्मा यांनी काल झारखंडमध्ये ही माहिती दिली. भाजपा 68 जागांवर, तर

ऑल झारखंड स्टुडंट्स युनियन पक्ष 10 जागा, जमशेदपूर पश्चिम आणि तमार या दोन जागा जनता दल युनायटेडला आणि चतरा मधील एक जागा चिराग पासवान यांच्या नेतृत्वाखालील लोक जनशक्ती पक्षाला देण्यात आल्या आहेत. दरम्यान इंडी-युतीचा जागांचा तिढा अद्याप कायम आहे. यावेळी झारखंड मुक्ती मोर्चा काँग्रेस, राष्ट्रीय जनता दल, आणि CPI बरोबर युतीत आहे. झारखंड मुक्ती मोर्चाचे कार्यकारी अध्यक्ष हेमंत सोरेन यांच्याशी जागावाटपाबाबत चर्चा करण्यासाठी राजदचे ज्येष्ठ नेते तेजस्वी प्रसाद यादव काल रांचीत दाखल झाले असून काँग्रेसचे राहुल गांधी आज जागावाटपावर चर्चा करण्यासाठी रांचीला येत आहेत. झारखंड विधानसभा निवडणूकीसीठी अधिसूचना काल जारी झाली. पहिल्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्यास सुरुवात झाली. या टप्प्यात 43 जागांसाठी 13 नोव्हेंबरला मतदान होणार आहे, तर दुसऱ्या टप्प्यात 28 नोव्हेंबरला 38 मतदारसंघांत मतदान होणार आहे. मतमोजणी 23 नोव्हेंबर रोजी होणार आहे.

**<u>हरियाणा</u>**

हरियाणा सरकारनं राज्यातील मूत्रपिंडाच्या आजारानं ग्रस्त रुग्णांना मोफत डायलिसिस सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेतला आहे. हरियाणाच्या नवनिर्वाचित मंत्रिमंडळाच्या पहिल्या बैठकीनंतर मुख्यमंत्री नायब सिंह सैनी यांनी काल ही घोषणा केली. गरिबांचे कल्याण हे आपल्या सरकारची प्राथमिकता असून मुख्यमंत्रीपदाची शपथ घेण्यापुर्वी आपण 24 हजार रोजगार निर्मिती केली आहे, अनुसूचित जातींच्या आरक्षणासंदर्भात सर्वोच्च न्यायालयानं दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय मंत्रिमंडळानं घेतल्याचंही मुख्यमंत्र्यांनी या बैठकीदरम्यान जाहीर केलं. किमान आधारभूत किंमतीत शेतमाल विकत घेतला जाईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

**<u>सर्वोच्च न्यायालय</u>**

बालविवाह प्रतिबंधक कायद्याला व्यक्ती विषयक वैयक्तिक कायद्यांच्या माध्यमातून अडथळे आणले जाऊ शकत नाही असं सर्वोच्च न्यायालयानं काल स्पष्ट केलं. सरन्यायाधीश न्यायमूर्ती धनंजय चंद्रचूड, न्यायमूर्ती जे बी पारडीवाला आणि न्यायमूर्ती मनोज मिश्रा यांच्या पिठानं देशात बाल विवाह प्रतिबंधक कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी मार्गदर्शक सूचनाही दिल्या. बालविवाह रोखण्याच्या उद्देशाने या कायद्याची अंमलबजावणी केली जाते. त्यामुळे अल्पवयीन मुलांच्या अधिकारांच्या संरक्षणालाच प्राधान्य असून वैयक्तिक कायदे या अंमलबजावणीत अडथळे म्हणून आणता येणार नाहीत, असं सरन्यायाधीश यावेळी म्हणाले. त्याचवेळी बालविवाह प्रतिबंधक कायद्यात काही त्रुटी असल्याचंही पीठानं नमूद केलं.

**<u>इस्त्रायल</u>**

इस्त्रायली लष्करानं लेबनानमध्ये सैन्य कारवाई सुरु ठेवली आहे. या भागात आणखी काही सैन्य तुकड्यांना पाचारण करण्यात आलं असून 23 गावांमधील नागरिकांना आवली नदीच्या उत्तरेकडे स्थलांतरित होण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. हिजबुल्लाहच्या सुविधा किंवा शस्त्रास्त्रांची मदत करणाऱ्यांवर कठोर कारवाई करणार असल्याचा इशारा इस्रायल लष्करानं दिला आहे.

**<u>भारत-सौदी</u>**

भारत आणि सौदी अरेबियादरम्यान राजकीय, सुरक्षा, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील द्विपक्षीय भागीदारी समितीच्या कामाची आढावा बैठक काल नवी दिल्लीत पार पडली. भारतीय शिष्टमंडळाचे नेतृत्व परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी केले, तर सौदीच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व राजकीय व्यवहार खात्याचे मंत्री डॉ. सौद अल साती यांनी केले. यावेळी प्रादेशिक आणि परस्पर हिताच्या जागतिक स्तरावरील मुद्द्यांवर ही चर्चा झाल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं सांगितलं.

**<u>महाविकास आघाडी</u>**

आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यात सुरू असलेल्या गैरप्रकारांची दखल निवडणूक आयोगानं घ्यावी आणि मतदार याद्यांमधल्या अनियमिततेबद्दल श्वेतपत्रिका काढावी, अशी मागणी महाविकास आघाडीच्या नेत्यांनी केली आहे.

आघाडीच्या घटक पक्षांच्या नेत्यांनी काल मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांची भेट घेतली आणि त्यांना यासंदर्भात निवेदन दिलं. तसंच विधानपरिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी निवडणूक आयोगालाही या संदर्भात पत्र लिहिलं आहे. पराभवाची भीती वाटत असल्यानं महाविकास आघाडीच्या समर्थकांची नावं मतदार याद्यांमधून वगळण्यासाठी अर्ज क्रमांक 7 आणि 8 मध्ये फेरफार केल्याचा आरोपही महाविकास आघाडीनं भाजपावर केला आहे.

**निवडणूक**

विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर मतदारांच्या मनात संभ्रम निर्माण करणाऱ्या आणि खोट्या बातम्या पसरवणाऱ्या १ हजार सातशे पेक्षा अधिक पोस्ट प्रसारित करणाऱ्या विविध समाज माध्यम वाहिन्यांना महाराष्ट्रातील मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी माहिती तंत्रज्ञान कायद्याअंतर्गत नोटीस बजावली आहे. यापैकी 300 हून अधिक पोस्ट निवडणूक आयोगानं आक्षेप दर्शवल्यानंतर डिलीट करण्यात आले अशी माहिती आयोगानं जारी केलेल्या पत्रकांत देण्यात आली आहे. महाराष्ट्रात 20 नोव्हेंबरला एकाच टप्प्यात विधानसभा निवडणूक होणार आहे. निवडणूक आयोगाच्या सी-व्हिजिल ॲपवर निवडणूक आचारसंहितेच्या उल्लंघनाच्या 420 तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. त्यापैकी 414 तक्रारींचा निपटारा करण्यात आला असून, सर्वाधिक तक्रारी ठाणे जिल्ह्यात निकाली काढण्यात आल्या आहेत. आचारसंहिता लागू झाल्यापासून राज्यात रोख रक्कम, अंमली पदार्थ, मद्य आणि महागड्या वस्तूंच्या स्वरूपात 10 कोटी 64 लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. अशी माहितीही निवडणूक आयोगानं दिली आहे.

**कोळसा मंत्रालय**

कोळसा मंत्रालयाद्वारे व्यावसायिक कोळसा खाणी संदर्भात लिलावाची 10 वी फेरी नुकतीच पार पडली. यामध्ये 44 निविदा सादर केल्या आहेत. ही बोली भारताच्या विकसित होत असलेल्या कोळसा क्षेत्रातला भाग धारकांचा सहभाग दर्शवत असल्याचं कोळसा मंत्रालयानं आपल्या निवेदनात म्हटलं आहे.

**क्रिकेट**

न्यूझीलंडविरुद्धच्या बंगळुरू क्रिकेट कसोटीच्या कालच्या तिसऱ्या दिवशी भारतानं दुसऱ्या डावात 3 बाद 231 धावा केल्या. न्यूझीलंडकडे सध्या 125 धावांची आघाडी आहे. भारताकडून विराट कोहली आणि सरफराज खान यांनी प्रत्येकी 70 धावा तर रोहित शर्माने 52 धावा करत भारताचा डाव सावरला. तत्पूर्वी न्यूझीलंडने पहिल्या डावात 402 धावा करून मोठी आघाडी घेतली होती.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.